NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक ३१.१०.२०२६ शनिवार

१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित झालेबाबत.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ येथे दाखल दिनांक २२.१०.२०२६ चे SUO MOTU PIL No. 01/2026 मध्ये मा. न्यायालयाने पारित केलेल्या दिनांक १५.१०.२०२६ चे आदेशान्वये **''फटाके फोडल्यामुळे होणाऱ्या वायु व ध्वनी प्रदुषणाबत''** नागरीक त्यांच्या तक्रारी नोंदवु शकतील. याकरीता पोलीस आयुक्तालय नागपुर शहर येथे तक्रार निवारण यंत्रणा तयार करण्यात आली आहे.

नमुद विषयाच्या संबंधाने नागरीकांच्या तक्रारी स्वीकारण्याकरीता मोबाईल क्र. ९८२३३००१०० हा क्रमांक कार्यान्वीत करण्यात आला असुन, तो २४ तास कार्यरत राहील. करीता सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, ''फटाके फोडल्यामुळे होणाऱ्या वायु व ध्वनी प्रदुषणाबत'' त्यांनी उपरोक्त मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. त्यांच्या तक्रारींची दखल घेवुन, उचीत कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

२) नागपूर पोलीस आयुक्तालय तर्फे आयोजीत ''रन फॉर युनिटी'' एकता दौड संपन्न :–

भारताचे प्रथम उप पंतप्रधान आणि देशाचे लोहपुरूष मा. सरदार वल्लभभाई पटेल यांची १५१ वी जयंती निमीत्ताने नागपुर शहर पोलीस दलाचे वतीने मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे प्रमुख उपस्थितीत, राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. यानिमीत्ताने आज दिनांक ३१.१०.२०२६ रोजी सकाळी ०६.०० वा. पोलीस जिमखाना येथुन, ''रन फॉर युनिटी'' एकता दौड चे आयोजन करण्यात आले होते. ''रन फॉर युनिटी'' एकता दौड चा मुख्य उद्येश मा. सरदार वल्लभभाई पटेल यांचे राष्ट्र निर्माणातील योगदानाचे स्मरण करुन, एकता, अनुशासन आणि देशभक्तीचा संदेश जनतेपर्यंत पोहचविणे तसेच, पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेमध्ये शारीरीक तंदुरुस्तीसह संघभावना निर्माण करणे असा होता.

''रन फॉर युनिटी'' या एकता दौडला पोलीस जिमखाना, सिव्हील लाईन येथुन मा. पोलीस आयुक्त यांनी हिरवी झेंडी दाखवुन सुरूवात केली. नमुद एकता दौडमध्ये मा. पोलीस आयुक्त यांचेसह सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी तथा पोलीस अंमलदार व त्यांचे कुटूंबीय व शालेय विद्यार्थी–विद्यार्थीनी यांनी स्फुर्तीने सहभाग घेतला. एकता दौड ची पोलीस जिमखाना, सिव्हील लाईन येथुन सुरूवात होवुन, वॉकर्स रोड ने पुढे जावुन, जापानी गार्डन चौक मार्गे जुना काटोल नाका–अवस्थीनगर चौक येथुन परत पुन्हा पोलीस जिमखाना असे ६ कि.मी. चे अंतर हे काही उपस्थितांनी एकतेच्या जयघोषात पार केले. तसेच काही सहभागी यांनी ३ किमी चे अंतर एकता दौड म्हणुन पार केले. धावतांना सर्व सहभागी यांचे चेहऱ्यावर अभिमानाचे तेज व हृदयात एकतेचा उत्साह झळकत होता. ''रन फॉर युनिटी'' च्या मार्गात ठिकठिकाणी नागरीकांनी भरभरून प्रतिसाद देवुन स्वागत केले व एकतेचा संदेश पसरविला.

''रन फॉर युनिटी'' एकता दौड दरम्यान, मा. पोलीस आयुक्त यांनी सहभागी उपस्थितांना संबोधीत करतांना, दैनंदिन जीवनात व्यायामाचे महत्व पटवुन दिले. तसेच निरोगी व सृदृढ शरीराकरीता नियमित व्यायाम करुन शारीरीक तंदुरुस्ती मिळवुन आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच भारताच्या एकीकरणामध्ये मा. सरदार वल्लभभाई पटेल यांनी पार पाडलेल्या ऐतिहासिक योगदानाची इंत्यभुत माहिती देऊन, त्यांच्या राष्ट्रनिष्ठा, दुरदृष्टी, एकता व अखंडतेच्या विचारांचा आदर्श प्रत्येकाने आपल्या जीवनात वृदधींगत करुन, जोपासावा असा संदेश दिला. तसेच, मा. पोलीस आयुक्तांमार्फतीने सर्व उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ देण्यात आली.

एकता दौड दरम्यान, मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त, श्रीमती विनिता शाहु व श्री वसंत परदेशी, मा. पोलीस उप आयुक्त श्रीमती महक स्वामी, श्री. आदित्य मिरखेलकर, श्री राहुल माकणीकर, श्री. संदीप पखाले, श्री. रमेश धुमाळ तसेच, इतर पोलीस अधिकारी व अंमलदार त्याचप्रमाणे त्यांचे परिवारासह शालेय विद्यार्थी व नागरीक हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.






(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक ३०.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०२ ईसमावर कारवाई करून एकुण ५,८५०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०२ ईसमांवर कारवाई करून एकुण ३३,२७०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ३३ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ४७ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १४६ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २६८ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १३४ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ७६ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १८ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १६४ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०४ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २२ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०४ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,१३७ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये २० केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २७ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,२१९ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ८,२२,६००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची कामगिरी :— नागपुर ग्रामिण हद्दीतील एकुण ०६ घरफोडीचे गुन्हे उघडकीस. गुन्ह्यातील ०२ आरोपींना अटक.

दिनांक ३०.१०.२०२६ रोजी, गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करतांना, दोन इसम संशयीतरित्या दिसुन आले. त्यांचेजवळ जात असता, ते पोलीसांना पाहुन पळण्याचे तयारीत असता, त्यांना घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव १) तन्मय प्रकाश गणवीर वय २३ वर्ष रा. बांबुवन नगरी, बहादुरा फाटा, उमरेड रोड, नागपुर २) हर्षल अनिल चनेकर वय २३ वर्ष रा. वार्ड क्र. ४, हनुमान मंदीरजवळ, भिवापुर जि. नागपूर असे सांगितले. त्यांना पळण्याचे कारण विचारले असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांचा गुन्हे अभिलेख तपासला असता, ते घरफोडीचे गुन्हयातील आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींना अधिक सखोल विचारपुस केली असता, त्यांनी पोलीस ठाणे बुटीबोरी हद्दीत वेगवेगळ्या ठिकाणी घरफोडीचे एकुण ०६ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन एक ०९ ग्राम सोन्याची लगड तसेच सोन्याचे वेगवेगळे दागिने, चांदीचे एकुण १२ शिक्के व वेगवेगळे दागिने, गुन्हा करतांना वापरलेल्या दोन ॲक्टिवा मोपेड, एक हिरो पॅशन प्रो दुचाकी आणि ०२ मोबाईल असा एकुण ६,७१,०००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना पुढील कार्यवाहीस्तव बुटीबोरी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली, पोनि. श्री प्रशांत ठवरे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



३) राणा प्रतापनगर पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.

दिनांक ३१.१०.२०२६ चे ००.०५ वा. चे सुमारास, राणा प्रतापनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, शंकर पंचेश्वर नावाचा हद्दपार इसम हा आयटी पार्क, पर्सिस्टंट बिल्डींगचे बाजुचे गल्लीमध्ये सार्वजनिक ठिकाणी हातात चाकु घेऊन आरडा—ओरडा करीत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे एक इसम हातात चाकु घेऊन शिवीगाळ करतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व नि:शस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव शंकर लेकराम पंचेश्वर वय २९ वर्षे, रा. गल्ली क्र. ५, संत तुकडोजी नगर, सुभाषनगर, राणाप्रतापनगर, नागपुर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातु एक घरगुती स्टीलचा चाकु कि. ५०/— रु.

चा जप्त करण्यात आला. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३८६७/२०२४ दिनांक २८.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रासह धुमाकूळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री शिवाजी गायकवाड, सहा. पोलीस आयुक्त (सोनेगाव विभाग), वपोनि. श्री. पकंज बोंडसे यांचे मार्गदर्शनाखाली,, पोउपनि. स्वप्निल राऊत, पोहवा. दिनेश भोगे, पोंअं. सचिन तिवारी व आंनद कावलिया यांनी केली.

४) नवीन कामठी पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ३१.१०.२०२६ चे ०२.२५ ते ०५.१० वा. चे दरम्यान, नवीन कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, एक ईसम आशा हॉस्पिटल जवळ गांजा विक्री करण्याकरीता येत आहे. अशा माहीतीवरून घटनास्थळी, पंचासमक्ष सापळा कार्यवाही केली असता, पोलीसांना एक ईसम कॉलेजबॅग सह पायदळ येतांना दिसला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागल्याने त्याचा पाठलाग करुन ताब्यात घेतले. त्यास नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव मोहम्मद शफीक मोहम्मद रफीक अन्सारी वय २६ वर्ष रा. वेटरनरी दवाखान्याजवळ, डॉक्टर बुनकर कॉलनी, नागपुर असे सांगीतले. त्याचे जवळील कॉलेजबॅगची झडती घेतली असता, त्यामध्ये ब्राऊन रंगाचे प्लास्टीक कव्हर असलेले ०५ पाकीटे दिसुन आली. पाकीटे उघडुन पाहिली असता, त्यामध्ये गांजासदृष्य अंमली पदार्थ वजनी ५.०८४ किलोग्राम मिळून आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी १) शादाब नावाचा ईसम, रा. कंटाबांजी, ओडीसा याचेकडुन पाहिजे आरोपी क्र. २) फैजान अन्सारी फिरोज अन्सारी वय २७ वर्ष रा. गोल बाजार, जुनी कामठी, नागपूर याचेकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन गांजा, एक मोबाईल, व कंटाबाजी ते नागपुर लिहलेले रेल्वे तिकीट असा एकुण १,११,६८०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब),(ii)(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, तिन्ही आरोपींविरूध्द पोलीस ठाणे नवीन कामठी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपी क्र. १ यास अटक करण्यात आली आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग), वपोनि. श्री. महेश आंधळे यांचे मार्गदर्शानाखाली, दुपोनि. रामेश्वर कायंदे, पोउपनि. योगेश नाल्टे, पोअं. विवेक दोरसेटवार, सुरज, तुषार व आशिष यांनी केली.

५) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी :— जिल्हा वर्धा, पोलीस ठाणे हिंगणघाट येथील एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्ह्यातील पाहीजे आरोपीस अटक.

दिनांक ३०.१०.२०२६ चे ००.२० वा. चे सुमारास, जिल्हा वर्धा पोलीस ठाणे हिंगणघाट येथील स्थानिक गुन्हेशाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी रेड कारवाई करुन दोन आरोपींना अटक करून, त्यांचेकडुन एकुण १,११३ ग्राम गांजा व इतर साहित्य किंमती ८७,१८५/— रु. चा मुद्देमाल जप्त केला होता. पोलीस ठाणे हिंगणघाट येथे आरोपींविरुध्द कलम ८(क),२०(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता व गुन्हयातील पाहिजे आरोपींचा शोध सुरु होता.

दिनांक ३०.१०.२०२६ रोजीचे रात्रगस्तीदरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, हिंगणघाट येथील अंमली पदार्थाचे गुन्हयातील हर्षल गिमेकर नावाचा आरोपी हा बेसा, मानेवाडा रोड, नागपुर परिसरात फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, परिसरात शोध घेतला असता, प्राप्त वर्णनाचा ईसम दिसुन आला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव हर्षल विनोद गिमेकर वय २४ वर्ष रा. संत गोमाजी वार्ड, हिंगणघाट जि. वर्धा असे सांगितले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तो वर नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी असल्याचे तसेच त्याचेवर पो.ठाणे हिंगणघाट येथे खुन, जबरी चोरी यासारखे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव स्थानिक गुन्हेशाखा हिंगणघाट जि. वर्धा यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. श्री भरत कऱ्हाडे, सपोनि सचिन गायकवाड, पोउपनि राहुल रोटे, सफौ. मुकेश खांडरे, पोहवा नारायण पारवेकर, चंद्रशेखर भारती, पोअं. दिनेश महल्ले, सुनिलकुमार यादव, लक्ष्मीकांत सोनटक्के, राहुल पाटील यांनी केली.



(गुन्हे)

<u>१) पोलीस ठाणे वाठोडा :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>

दिनांक ३०.१०.२०२६ चे १६.२० वा. चे सुमारास, फिर्यादी शिवकुमार रामअवतार शाहु वय ४६ वर्ष रा. ०३, पॅन्थरनगर, पावर हाऊस समोर, हिवरी नगर, वाठोडा, नागपुर हे त्यांचा मित्र नामे किशोर उर्कुडा जामगडे वय ५५ वर्ष रा. बिडगाव, बुध्द विहाराजवळ, हनुमान मंदीरचे बाजुला, नागपुर यांचेसह त्याचे दुचाकी क्र. एमएच ४९ बीडी ७२३ ने डबलसिट सामान घेण्याकरीता मार्केट येथे जात असतांना, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, बिडगाव कडुन छोटी तरोडीकडे जाणारे रोडवरील पॉलीकॅब इंडीया लिमीटेड कंपनी समोर एका महिंद्रा बोलेरो पिकअप मालवाहक गाडी क्र. एमएच ४९ एटी ४४९३ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे दुचाकीला धडक देवुन, घटनास्थळावरून पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादीचे गाडीवर मागे बसलेलो त्यांचे मित्र खाली पडुन गंभीर जखमी व फिर्यादी हे किरकोळ

जखमी झाले. जखमी यांना उपचाराकरीता रामदेव बाबा हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचे मित्र किशोर जामगडे यांना तपासुन मृत घोषीत केले. फिर्यादीचा उपचार करण्यात आला आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे मपोउपनि. पुजा शेळके ७४१४९४९६२६ यांनी बोलेरो वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१,१२५(अ),१०६(१) भा.न्या.सं. सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. वाहन चालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे हिंगणा :– गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ३०.१०.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, हिंगणा पोलीसांना प्राप्त माहितीवरुन, त्यांनी समृध्दी सर्कलकडुन मुंबईकडे जाणाऱ्या रोडवर एक पांढरे रंगाचे दहाचाकी कंटेनर क्र. एचआर ५५ एझेड ८१३८ ला थांबवुन, पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये एकुण ६८ लहान मोठी गोवंशीय जनावरे यांना अंत्यत क्रुरतेने, निर्दयतेने कोंबुन ठेवल्याचे दिसुन आले. वाहनामधील इसमांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव वाहनचालक क्र. १) मोहम्मद सलीम मोहम्मद हुसेन वय ४० वर्षे रा. ता. मदारपुरा जि. मंदसौर, मध्यप्रदेश, सोबती क्र. २) नियाज मोहम्मद कादीर मोहम्मद वय ३२ वर्ष रा. वार्ड क्र. १, गाव मुलतानपुरा, जि. मंदसौर, मध्यप्रदेश २) शाहरुख न्यारगर मुश्ताक न्यारगर वय २३ वर्ष रा. वार्ड क्र. १, निचला मोहल्ला, बोललगंज, ता. मल्हारगढ, जि. मंदसौर, मध्यप्रदेश ३) जाकीर खान नासीर खान वय ४० वर्ष रा. ग्राम जावद जि. निमच, मध्यप्रदेश असे सांगितले. त्यांना जनावरांबाबत विचारणा केली असता, नमुद जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन गोवंशीय जनावरे व कंटेनर असा एकुण किंमती अंदाजे १६,८०,०००/–रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना देवनगरी गोसेवा संस्था, कोलार, उमरेड रोड, बुटीबोरी व गौरक्षाधाम समीती, धंतोली, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी पोनाअं पराग गुजर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे हिंगणा येथे पोउपनि निलेश ओटे ७०२०७१७३६७ यांनी आरोपींविरूध्द कलम ११(१)(ड),११(१)(ई) प्राणी क्रुरता अधिनियम–१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पाहीजे दोन्ही आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.